सहायक नगर रचनाकार (पदविकाधारक) संवर्गातील अधिकाऱ्यांना नगर रचनाकार (गट-अ/राजपत्रित) पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक-पदोन्न-१३१९/१५१३/प्र.क्र.३६/(२)/नवि-२७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ सप्टेंबर, २०१९.

<u>वाचा</u> :- १) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या-१२, दि.२८.०४.२०१५.
२) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या-१२, दि.१६.०७.२०१५.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दि.१२.०९.२०१६.
४) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.११४/कार्या-१२, दि.१५.०६.२०१७.
५) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.आस्था/नर-पदोन्नती/पदवी/प्रशा- १/३४०१, दि.०४.०७.२०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील नगर रचनाकार (गट-अ/राजपत्रित) (वेतनसंरचना रु.१५६००-३९१००+ग्रेड पे रु.५४००/-)(६ व्या वेतनआयोगाप्रमाणे) (एस-२०:५६१००-१७७५००) (७ व्या वेतन आयोगाप्रमाणे) संवर्गातील पदविकाधारकांच्या कोट्यातील रिक्त पदे पदविकाधारक सहायक नगर रचनाकार (श्रेणी-२)(पदविकाधारक) (वेतनसंरचना ९३००-३४८००+ग्रेड पे रु.४४००/-) (६ व्या वेतनआयोगाप्रमाणे)(एस-१५:४१८००-१३२३००)(७ व्या वेतन आयोगाप्रमाणे) या निम्न संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीने भरण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीची बैठक, दि. २२ फेब्रुवारी, २०१९ रोजी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे घेण्यात आली होती. त्यानुसार विभागीय पदोन्नती समितीने सेवाज्येष्ठतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यासाठी पात्र असलेल्या अधिकाऱ्यांच्या सन २०१७-१८ साठी तात्पुरती निवडसूचीस मान्यता दिली असून सदर अधिकाऱ्यांना पदोन्नती व पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या पदविकाधारक सहायक नगर रचनाकार (श्रेणी-२)(पदविकाधारक) संवर्गातील अधिकाऱ्यांना नगर रचनाकार (गट-अ / राजपत्रित) (वेतनसंरचना रु.१५६००-३९१००+ग्रेड पे रु.५४००/-)(६ व्या वेतनआयोगाप्रमाणे) (एस-२०:५६१००-१७७५००) (७ व्या वेतन आयोगाप्रमाणे) पदावर खालील अटींच्या अधीन राहून आणि महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब

(राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०१५, दि.२८ एप्रिल, २०१५, दि.१६ जुलै, २०१५ व दि.१५ जून, २०१७ मधील तरतुदी व पदोन्नतीने पदस्थापनेकरिता महसुली विभाग वाटपाकरिता दिलेले पसंतीक्रम विचारात घेऊन **खुल्या प्रवर्गातून** तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	जात प्रवर्ग	प्रस्तावित केलेली पदस्थापना
१	२	३	४
१	श्री.श्रीहरी दत्तात्रय दाभाडे	इ.मा.व.	नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक
२	श्रीमती माया अशोक कुलकर्णी	खुला	सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर शाखा
३	श्री.सुरेश विश्वनाथ सोनसळे	इ.मा.व.	विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, ठाणे
४	श्री.गंगाधर मोठाभाऊ अहिरे	इ.मा.व.	नगर रचनाकार, वर्धा नगर परिषद (शा.आ.)
५	श्री.संजय आण्णा पवार	भ.ज.ब.	नगर रचनाकार, अचलपूर नगर परिषद, अचलपूर (शा.आ.)
६	श्री.श्रीनिवास भिमराव मानकरे	खुला	नगर रचनाकार, लातूर महानगरपालिका (शा.अ.)
७	श्री.रामराव पांडुरंग पाटील	खुला	भूमि संपादन विशेष अधिकारी (११) कोल्हापूर
८	श्री. सय्यद शरफोद्दीन अब्दुल लतीफ	खुला	नगर रचनाकार,वर्ग-१, मूल्यांकन तज्ञ नांदेड/परभणी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
९	श्रीमती शुभांगी राजन कुलकर्णी	खुला	भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्र.२, पिंपरी, पुणे
१०	श्री.उदयकुमार जनार्दन तारळेकर	वि.मा.प्र.	नगर रचनाकार, अकोला महानगरपालिका (शा.आ.)
११	श्री.औदुंबर दिगंबर नेर्लेकर	खुला	संचालक, नगर रचना,महाराष्ट्र राज्य, पुणे
१२	श्री.चंद्रशेखर अनंत तायशेटे	खुला	औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, औरंगाबाद (प्र.नि.)
१३	श्रीमती अंजली शशांक साठे	खुला	उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका
१४	श्री.पद्माकर बाबासाहेब पाटील	खुला	सहायक संचालक, नगर रचना, मुल्यांकन अमरावती

अटी व शर्ती :-

I. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध सद्य:स्थितीत कोणतीही विभागीय चौकशी / न्यायालयीन कारवाई प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही.

II. पदोन्नतीचे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील असल्याने नियमित निवडसूचीवरील पात्रापात्रतेनंतर आणि सदर निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा

आयोगाच्या मान्यतेने नियमित केल्यानंतर उक्त अधिकारी हे पदोन्नतीच्या पदावर सेवाज्येष्ठता व अन्य सेवाविषयक लाभ मिळण्यास पात्र ठरतील.

III. ज्येष्ठतासूचीनुसार विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांची पात्रापात्रता तपासण्यात आली असून या संदर्भात भविष्यात कोणतेही प्रकरण उद्भवल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने यथायोग्य निर्णय घेण्यात येईल.

IV. जात पडताळणी कार्यालय यांच्याकडून प्राप्त जात पडताळणी प्रमाणपत्रासंबंधी भविष्यात कोणत्याही स्तरावर तफावत आढळून आल्यास संबंधित मागासवर्गीय अधिकाऱ्याची पदोन्नती रद्द करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

V. पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि./१६-ब यांनी दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देण्यात येत आहे.

VI. पदोन्नती देण्यात येत असलेले अधिकारी सामान्य प्रशासन विभाग, दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळवून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नसल्याबाबत संचालनालयाने खात्री केली असल्याने, सदर मागासवर्गीय अधिकाऱ्यांबाबत भविष्यात कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संचालनालयाची राहील.

VII. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

VIII. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०२.०६.२०१४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधीत अधिकाऱ्यांनी पदोन्नतीपूर्वी मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

IX. उपरोक्त नमूद अटींशिवाय उक्त अधिकाऱ्यांची पदोन्नती त्यांच्या वयाच्या ५०/५५ वर्षाच्या पुढे किंवा अर्हताकारी ३० वर्षाच्या सेवा कालावधीपुढे सेवेत राहण्यास पात्रापात्रता आजमाविण्याच्या निर्णयाच्या अधीन राहील.

X. उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.१२ येथील अधिकाऱ्यांची पदस्थापना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील परिशिष्ट-तीन, नियम ४० (१) (२) (३) (४) व परिशिष्ट-दोन मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

०२. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वर नमूद अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या ठिकाणी रुजू होण्याकरिता कार्यमुक्ततेचे कार्यकारी आदेश तातडीने निर्गमित करावेत.

०३. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांनी पदोन्नतीचे कार्यकारी आदेश प्राप्त होताच पदोन्नतीने नियुक्तीच्या ठिकाणी विहित कालावधीत रुजू होणे आवश्यक आहे. पदोन्नत अधिकारी हे विहित कालावधीत रुजू न होता ते ज्या दिनांकास पदोन्नतीच्या ठिकाणी रुजू होतील, त्या दिनांकापासून पदोन्नत झाल्याचे समजण्यात येईल.

०४. पदोन्नत अधिकारी हे पदोन्नतीने नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास किंवा पदोन्नती न स्वीकारल्यास, त्यांना पदोन्नती नको आहे, असे समजून सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय

क्र.एसआरव्ही-१०८७/३१११/प्र.क्र.११/८९/१२, दि.३०.०४.२०११ मधील आदेशानुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. तसेच अशा अधिकाऱ्यास कालबद्ध पदोन्नती / सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला / दुसरा लाभ मंजूर करण्यात आला असल्यास, वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.आप्रयो-१०१५/ प्र.क्र.१११/ २०१५/सेवा-३, दि.२३ डिसेंबर, २०१५ मधील तरतुदीनुसार सदरचा लाभ काढून घेण्यात येईल. मात्र दिलेल्या लाभाची वसुली करण्यात येणार नाही.

०५. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांनी पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.१२.०९.२०१६ मधील तरतुदीनुसार त्यांचे नांव निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल. तसेच यानंतर पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांची पदोन्नतीसाठीची पात्रता तपासण्यात येणार नाही. तद्नंतर गुणवत्तेप्रमाणे संबंधित अधिकारी पदोन्नतीसाठी पात्र ठरल्यास त्याचा नियमित निवडसूचीत समावेश करण्याबाबत त्यांच्या नांवाचा विचार करण्यात येईल.

०६. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांनी पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प न दिल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११ (१) (ए) व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ मधील नियम १३ (अ) (१) (२) (ब) (१ व २) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन त्यांची वेतननिश्चिती करण्यात यावी.

०७. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांना पदोन्नतीने नियुक्तीच्या ठिकाणी ज्या दिनांकास हजर होण्यास कळविण्यात आले आहे व ते नियुक्तीच्या ठिकाणी ज्या दिनांकास हजर होतील, याबाबत शासनास तातडीने अवगत करण्यात यावे.

०८. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांनी पदोन्नतीने नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास किंवा राजकीय दबाव आणून नियुक्ती अन्य ठिकाणी करण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात त्यानुसार नोंद घेण्यात येईल. तसेच राजकीय दबावाची कृती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ (३) व २३ चा भंग करणारी असल्याने संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, यांची नोंद घेण्यात यावी.

०९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९१११७५३५५१७२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2019.09.16 10:47:54 +05'30'

(विष्णू पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति :-

सर्व संबंधित अधिकारी यांना संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत.

प्रत :-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१.मुंबई.

२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.अपर मुख्य सचिव (नवि-१) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, मुंबई
७. सर्व विभागीय आयुक्त
८. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१. (३-प्रती)
९. आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला
१०. आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर
११. महानगर आयुक्त, औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, औरंगाबाद
१२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/नागपूर.
१३. जिल्हाधिकारी, नाशिक/अमरावती/ठाणे/वर्धा/लातूर/कोल्हापूर/नांदेड/पुणे/अकोला/औरंगाबाद/ नागपूर/परभणी
१४. विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, ठाणे
१५. नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक
१६. सर्व सह संचालक, नगर रचना, -------------------.
१७. उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका
१८. सहायक संचालक, नगर रचना, मुल्यांकन, अमरावती
१९. सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर
२०. मुख्याधिकारी, वर्धा नगर परिषद, वर्धा
२१. मुख्याधिकारी, अचलपूर नगर परिषद, अचलपूर
२२. भूमिसंपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्र.२, पिंपरी-पुणे
२३. भूमिसंपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर
२४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, नागपूर.
२६. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, --------------------------------------
२७. निवडनस्ती / नवि-२७.

*****